Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# इसापनीतीकथांतून पर्यावरणशिक्षण एक प्रबोध

प्रा. उत्तम करमाळकर,

आर्टस, सायन्स, कॉमर्स कनिष्ठ महाविद्यालय, नाशिकरोड.

**प्रास्ताविक :-**

इसाप इ.स. सहाव्या शतकापूर्वी होऊन गेला. फ्रिजिआ नामक देशातील आओरिअम गावी त्याचा जन्म झाला. गुलामांच्या घरी त्याचा जन्म झाला होता. इसाप हा जन्मापासून कुरूप होता. म्हणून त्याच्या मालकाने त्याला दूरच्या शेतावर राखणीला ठेवले. तो निसर्गाच्या सानिध्यात घडला. निसर्ग मानवाला अनेक गोष्टी शिकवित असतो. हा निसर्ग आपल्यावर संस्कार करीत असतो. तो संस्कार इसापने आत्मसात केला होता. आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाला इसाप कधीच विसरला नाही. पर्यावरणाचा समतोल ही नैसर्गिक देणगी मानवाला लाभला आहे. आजच्या मानवाने नैसर्गिक पर्यावरण असंतुलित केले आहे. मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे नैसर्गिक जीवन गढूळ झाले आहे. पर्यावरणाचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. मनुष्याला दिर्घकाळ जगायचे असेल तर त्यांने पर्यावरणाचे संरक्षण करणे करणे आवश्यक आहे. आपल्या दीर्घायुष्याचे रहस्य पर्यावरण संरक्षणातच आहे. हे इसापने कित्येक वर्षापूर्वी ओळखले असावे. कदाचित त्याच्या कुरूपतेमुळे त्याला पर्यावाणाची ओळख झाली असावी. तो पर्यावरणासंबंधी सदैव जागृत असल्याचा दिसतो. आपल्या नीतीकथांतून त्यांने पर्यावरणातील प्रत्येक घटकाला मानवी भावभावना बहाल केल्या आहेत.

**इसापच्या पर्यावरण शिक्षणाचा उद्देश :-**

**(१) ज्ञानात्मक उद्देश :-**

१) इसाप आपल्या कथांमधून जागतिक स्तरावरील पर्यावरणाचे ज्ञान देतो.

२) आपल्या आजूबाजूच्या पर्यावरणाची स्थिती, परिस्थितीची ज्ञान करून देतो.

३) जैविक-अजैविक घटकांची प्रक्रिया माहिती करून देणे.

४) मानवी उदरनिर्वाह तत्वातील उणिवांची जाणीव करून देणे.

५) पर्यावरणातील अन्नसाखळीची ओळख देणे.

६) पर्यावरण आणि मानवी जीवन यांची सांगड माहित करून देणे.

(२) भावनात्मक उद्देश :-

१) वनस्पती, वृक्ष, जंगल प्राणीमात्र यांच्याशी मैत्रीभाव निर्माण करणे.

२) धार्मिक व सांस्कृतिक कार्याबद्दल सद्भावना निर्माण करणे.

३) जंगलातील प्राणीमात्रांची शिकार / निर्दय भावनेचा निचरा करणे.

४) इसाप वायू, जल, मृदा, ध्वनी आणि सामाजिक प्रदूषण थांबविण्यासाठी निरनिराळ्या पध्दतीने बोध घडवितो.

५) आपल्या आजूबाजूची स्वच्छता राखण्यास सक्रिय सहकार्य करणे.

इसापच्या पर्यावरण शिक्षणाचे महत्व :-

मानवी जीवन सुखकर होण्यासाठी इसापने अमर्याद बोध घडविला आहे. मानवी जीवन दीर्घायुषी, सुखकर, आनंदमय आणि व्यवस्थित होण्यासाठी पर्यावरण संतुलनाचा अभ्यास महत्वाचा आहे. आजच्या विज्ञान, तंत्रज्ञान युगात औद्योगिक विकासामुळे पर्यावरण संतुलनाचा डोलारा कोसळला आहे. स्पर्धेच्या कसरतीमध्ये पर्यावरणाच्या अनेक मोठमोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात आली आहे. मानव, प्राणी, वनस्पती यांचे आरोग्य नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. हे थांबविण्यासाठी इसापच्या नीतीकथांचा आधार घ्यावा लागेल.

(१) गतिमान उद्योगामध्ये मानव वृक्षतोड करून सिमेंटच्या जंगलात राहू लागला आहे. हे करताना मानवाचा नैसर्गिक प्रक्रियेत हस्तक्षेप वाढला आहे. त्याचा पर्यावरणावर विपरित परिणाम होत आहे. संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात आली आहे. हे टाळण्यासाठी इसापने आपल्या नीती कथांतून पर्यावरणाबद्दल लोकजागृती घडवली आहे. झाड आणि कुऱ्हाडीचा दांडा, जुने झाड उपटून पुन: लावले, बाभळ आणि सागवन, वाकडे झाड, अरण्य आणि लाकूडतोड्या, सागवनाचा वृक्ष आणि कांटेझाड, मोठे झाड आणि लहान झाड, बोकड आणि झाड या कथांमधील प्रतिमा आपल्याला पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याचे मार्ग सांगतात.

(२) पर्यावरणामध्ये साधनसंपत्तीचा अभ्यास केला जातो. मानवी विकासासाठी नैसर्गिक संसाधनाची गरज आवश्यक असते. इसाप आपल्या कथेतून नैसर्गिक संसाधानाची माहिती सुत्रबध्दपणे देतो.

(३) इसाप आपल्या नीतीकथेतून मनुष्य आणि पर्यावरणातील सभोवतालच्या परिस्थिती परस्परसंबंधाचा, आंतर क्रियांची माहिती देतात. हवा, पाणी, मृदा, प्राणी, वनस्पतींची यांच्या कार्याची माहिती आपल्याला देतात.

(४) पारंपरिक ऊर्जासाधने मर्यादित आहेत. ती कधी ना कधी संपुष्टात येणार आहेत याची जाणीव इसाप वारंवार करून देतो.

(५) महाराष्ट्रात फक्त १७ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे. जमिनीची सुपिकता कमी होत चालली आहे. शेती उत्पादनात होणारी घट लक्षात घेता पर्यावरण शिक्षणाचा अभ्यास आवश्यक आहे.

**इसापनीती आणि पर्यावरण शिक्षण :-**


इसापच्या नीतीकथा रूपकात्मक आहेत. त्याच्या कथेतील सर्व प्राणी मानवाप्रमाणे बोलताना दिसतात. आपल्या मनातील भावभावना मानवाप्रमाणे व्यक्त करताना दिसतात. जगातील कोणताही प्राणी पर्यावरणाची कोणत्याही प्रकारची हानी करीत नाही. उलट प्राण्यांमुळे पर्यावरणाचे भरणपोषण घडत असते. सजीवांच्या जीवक्रमावर परिणाम करणारी भोवतालची परिस्थिती आहे. मानवी जीवनावर पर्यावरणाचा परिणाम होतो. त्यामुळे प्रत्येक प्रदेशातील मानवी जीवनामध्ये फरक दिसतो. निसर्गात असलेल्या सर्व घटकांचा समावेश नैसर्गिक पर्यावरणात होत असतो. पृथ्वीवरील भूरूपे, हवामान, पाणी, खनिजे, मृदा, सुर्यप्रकाश, प्राणी, वनस्पती हे सर्व नैसर्गिक पर्यावरणांचे घटक आहेत. हे घटक इसापच्या कथेतून प्रतित होताना दिसतात. इसापला आपल्या आयुष्यात गुलामगिरीचे जीवन जगावे लागले. अशा अवस्थेत इसापने आपल्यातला चांगुलपणा कुठेही लपवला नाही. कोणताही प्राणी हा वर्तमानाचा विचार करतो. उद्याचा विचार उद्यावर टाकून देतो. त्याचा आज विचार करीत नाही. कोणताही प्राणी साठवण्याच्या कामाला कधीही लागत नाही. यामुळे पर्यावरणाचे रक्षण झाले आहे. इसापच्या ५५० कथांमध्ये सर्व प्राणी विविध रूपात आलेले दिसतात. ज्या निसर्गामुळे आपण जन्माला आलो त्याच्याशी

आज मानव प्रतारणेने वागत आहे. मानवाने आपला स्वार्थ बाजूला सारला तर सर्व जगाचे कल्याण होईल. मानवाने पर्यावरणाचे सरंक्षण केले तरच पर्यावरण मानवाचे रक्षण करू शकणार आहे. मानवाने पर्यावरणाला हानी पोहचवल्यामुळे मानवी आजारामध्ये वाढ होत आहे. नवनवे आजार वाढू लागले आहेत. मानवी अपत्य जन्माला येण्यात अडथळे येऊ लागले आहेत. बौध्दिक पातळीत घट होताना दिसते आहे. येणाऱ्या काळात मानवी जातीचे अस्तित्व टिकविण्यासाठी पर्यावरणसंरक्षणाची गरज आहे. इसापने याची जाणीव करून दिली आहे. इसाप मानवी जीवन कल्याणाकडे जाण्यासाठी पर्यावरण रक्षणाचा मार्ग अवलंबण्यास सांगतो. सर्वसामान्य माणूस ज्यावेळी चांगल्या कामाचा मार्ग स्विकारतो तेव्हां सामाजिक कामाला वेग येतो. भारतीय संस्कृतीमध्ये मानवी जीवनाची दिनचर्या पर्यावरणाशी निगडीत आहे. नदीच्या वाहत्या शुद्ध पाण्यात स्नानसंध्या करणे, शूचिर्भूत होवून सूर्यनमस्कार करणे, शेतीकाम करणे, व्रतवैकल्ये साजरे करणे आदी बाबी निसर्गाशी निगडीत आहेत. पण समाजात अनिष्ट प्रथा-परंपरा सुरू झाल्याने त्याचा परिणाम पर्यावरणावर दिसू लागला आहे. लाकसंख्या वाढत चालली आहे. अन्न, वस्त्र, निवारा यांच्या गरचा भागविण्यासाठी जमीन, वारा, पाणी, वनस्पती, प्राणीजीवन इत्यादी सर्वांवर भार पडत चालला आहे. जंगलाचां नाश होत चालला आहे. प्राण्यांची शिकार अजून बंद होईनाशी झाली आहे. पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. पावसाची अनिश्चितता दिसू लागली आहे. दुष्काळाची तीव्रता वाढू लागली आहे. येणारा काळ फार कठीण असणार आहे. मराठवाडा परिसरात प्राणी पाण्यासाठी गावात प्रवेश करू लागली आहेत. प्रसंगी लोकांवर हल्ला करू लागले आहेत. त्यामुळे लोक त्यांचा नाहक बळी घेऊ लागले आहेत. नद्यांची स्वच्छता करणे आवश्यक आहे. लोकांच्यापर्यंत प्रबोधन जेवढ्या प्रमाणात व्हायला पाहिजे तेवढ्या प्रमाणात झालेले नाही. यासाठी इसापच्या नीतीकथांचा आधार घ्यावा लागेल. भारतामध्ये असलेल्या विवाहपध्दती, सामाजिक बांधिलकी, समाज व्यवस्था, धार्मिक स्वातंत्र्य, लोकशाही, साक्षरता, श्रद्धा-अंधश्रद्धा, विश्वास, परंपरा आणि जीवनाच्या निरनिराळ्या पद्धती या परिस्थितीमूळे पर्यावरणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत आहे. भारतात लोकसंख्या वाढत्या स्वरूपाची आहे. त्यावर पाहिजे त्या प्रमाणात नियंत्रण घालण्यात आलेले नाही. यासाठी इसापच्या नीतीकथांचा चांगल्या रितीने अभ्यास करता येईल. त्याचा

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

परिणाम मानवाच्या इच्छाशक्तीवर सहजरित्या होऊ शकतो.

**इसापने सागिंतलेले पर्यावरणशिक्षण :-**




**इसापने सांगितलेले जैव विविधतेचे महत्व :-**

जैव विविधतेला सर्वत्र महत्व आहे. इसापने आपल्या कथांच्या माध्यमातून जैव विविधतेचे महत्व आपल्यासमोर मांडले आहे. जंगलातील वनस्पती प्रकाश संश्लेषणाच्या माध्यमातून हवेतील कार्बन वायूचे प्रमाण कमी करण्याचे काम करतात. ऑक्सिजन चक्र, नायट्रोजन चक्र, कार्बन चक्र, जल चक्र चालविण्यास मदत करीत असतात. जगंलातील वनस्पतीची धूप रोखत असतात. जंगल वनस्पतीचे फायदे मानवाला अनेक प्रकारे झालेले आहेत. जैवविविधतेमुळे पर्यावरणाचे संवर्धन होते, मृदा तयार व्हायला अनेक वर्षाचा कालावधी लागतो. हवेतील शुद्धपणा, अभिसरणयुक्त जलसंतूलन, नद्या, तलाव, सरोवरे, विहिरीमधील संतूलन रोखण्यास मदत होते. मानवाला संपन्न करण्यामध्ये या जैवविविधतेचा

सिंहाचा वाटा आहे. खऱ्या पालकत्वाची भूमिका ते बजावत आहे. जैवविविधतेतून जनावरांचे मांस, इंधन निवारा साहित्य, औषधे उपलब्ध होतात. इसापच्या काळातील समाज धार्मिक भावना जपणारा होता. त्यामुळे जैवविविधतेला सामाजिक, धार्मिक, नैतिक व सांस्कृतिक महत्व होते. आपल्या भारतीय संस्कृतितही नागपूजा, वृक्षपूजा, बैलपोळा, दसरा, हरितालिका, घटस्थापना, कोजागिरी पौर्णिमा, वसुबारस, वसंतपंचमी, गुढीपाडवा, सत्यनारायण पूजा करीत असतो. मानवी जीवनात पर्यावरणाला फार महत्व आहे. पर्यटनस्थाळांना जेव्हां भेटी दिल्या जातात तेव्हा आपल्याला अनेक प्राण्यांचे दर्शन घडवले जाते. आपल्या देव-देवतांनी प्राणीमात्रांना आपल्या जवळ स्थान दिलेले आहे. विष्णू नागावर विराजमान आहे, शंकराजवळ गाय व गळ्यात नाग आहे, गणपतीचे वहान उंदीर आहे, कार्तिकाचे वहान मोर, सरस्वतीचे वहान मोर, हंस आहे, दुर्गामातेचे वहान सिंह आहे, यमाचे वहान रेडा, ज्योतिबाचे वहान, खंडोबाचे वहान घोडा आहे. अर्थात, देवांनीही आपल्याला पर्यावरण रक्षाणाचा मार्ग दाखविला आहे. वटवृक्ष, तुळस यांना विशेष महत्व आहे. पूजा विधीमध्ये पाना-फुलांना आपण विशेष महत्व आहे. काही प्राण्यांना आपण देव म्हणून त्यांची पूजा करतो. जगातील शास्त्रज्ञांनी आतापर्यंत २५०० वनस्पतींची ओळख आपल्याला करून दिली आहे. पण त्यातील अनेक प्रजाती नाश पावल्या आहेत. निसर्गातील अनेक प्रजाती रोगजंतूना आपोआप प्रतिकार करीत असतात. जंगली भाताची जात विषाणालू बळी पडत नाही. मानवाला हजारो वनस्पतींचे ज्ञान झालेले नाही. पर्यावरणांची हानी थांबवू शकणाऱ्या किटकांचा शोध घेण्यास इसाप सांगायला विसरत नाही. परिसंस्थांची अन्नशृंखला असते. याशिवाय काही अनउत्पादक वनस्पती वाटतात. पण त्यांचे पर्यावरणातील स्थान मानवांने समजून घेणे आवश्यक आहे. दवणा आणि वाळवी मानवाला उपयुक्त वाटत नाही. परंतु या वनस्पती जमिनीत सुक्ष्म बिळे करतात. अर्थात जमिनीला ऑक्सिजचा पुरवठा व जमिन भुसमुशीत करण्याचे काम करीत असतात. याचे महत्व मानवाने जाणून घेणे आवश्यक आहे. इसापने या बाबी स्वत: शोधण्यास प्रोत्साहन दिले आहे. इसापने मानवी जीवन कल्याणाकडे जाण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करण्यास मानवाने कधीही मागे पडू नये असे सांगितले आहे. ज्यावेळी निसर्गाचा नाश होईल त्यावेळी मानवी जीवाचे अस्तित्व संपूष्टात येईल.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

इसापच्या सत्यनिष्ठेमुळे त्याला आपल्या प्राणास मुकावे लागले. त्यानंतर दोनशे वर्षांनी त्याचा पुतळा अथेन्स शहरातील मध्यवर्ती ठिकाणी उभा केला. एका सामान्यातील सामान्य माणसाने लोकांना चांगला मार्ग दाखवला आहे. त्याच्या कथा मुलांना प्रेरक आहेत. अभ्यासकांना दिशा दाखविणाऱ्या आहेत. त्याचे निसर्ग, प्राणीमात्रावरील प्रेम कधीही न संपणारे होते. एक गुलाम म्हणून तो अनेक वर्ष जगला, स्वत:च्या कुरूप चेहऱ्यामुळे लोकांपासून अनेक वर्ष दूर रहावे लागले. या कालखंडात त्यांने प्राणीमात्रांशी, निसर्गाशी नाते घट्ट केले. निसर्गातील पाना-फुलांशी संवाद साधू लागला. प्राणीमात्रांना त्यांना जवळून जाणून घेतले. प्राणी वृक्षवेलींचे संवर्धन कसे करतात. हे त्याने जवळून समजून घेतले. म्हणून त्यांने आपल्या गोष्टीतून पर्यावरण समजून सांगण्याचा शंभर टक्के प्रयत्न केला आहे. निसर्गाचे संवर्धन करणारा आद्य घटक म्हणजे प्राणी, किटक, मुंगी, सरपटणारे जीव आहेत. यांच्यामुळे निसर्गाचे संवर्धन झाले आहे. खरं पर्यावरण या प्राण्याकडून मानवाने समजून घेण्याची आवश्यकता आहे. मानवाने पर्यावरणात ढवळाढवळ करायला सुरवात केल्याने त्याचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवर होवू लागला आहे. याची जाणीव त्याकाळात इसापने करून दिली होती. आज आपण पर्यावरण प्रेमींच्या मदतीला धावणे आवश्यक आहे.

संदर्भसूची :-

१) इसापनीती - ५४० कथा--संपा. राजेश रघुवंशी
२) पर्यावरणशास्त्र एक अभ्यास--तु. म. वराट, तु.ना. घोलप--रेणूका प्रकाशन, औरंगाबाद.
३) पर्यावरण शिक्षण---डॉ. डी. आर. कुलकर्णी-- विद्या प्रकाशन, नागपूर.
४) सण, वार, व्रत-वैकल्ये-----श्री स्वामी समर्थ प्रकाशन, दिंडोरी, जि. नाशिक.